### रोह्यात अल्पवयीन तरुणी वर अत्याचार करुन ती राहिली गर्भवती

**रोहा |** रोहा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 01/02/2025 रोजी ते दि.28/06/2025 रोजी च्या दरम्यांत मौजे भुवनेश्ववर आदिवासीवाडी येथे आरोपीत याचे राहते घरात ता. रोहा पिडीत मुलगी वय- 16 वर्षे 10 महीने, 18 दिवस ही अल्पवयीन असल्याचे माहीत असुन सुध्दा यांतील आरोपीत क्र. 1 यांने तीच्याशी शारीरिक संबंध ठेवुन तीला तीन महीन्याची गरोदर करुन तसेच आरोपीत क्र. 2 ते 5 यांना माहीती असुन सुध्दा लग्न करण्याचे उददेशाने हळदी समारंभ केला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीस दिनांक 29/06/2025 रोजी अटक करण्यात आली आहे.

याबाबत रोहा पोलीस ठाणे गुरनं.134/2025, भा.न्या. सं.क.64(2),(आय), 64(2),(एम), 3(5),बालकांचे लैंगिक अत्याचारापासुन संरक्षण अधिनियम 2012 चे कलम.4,8, बालविवाह प्रतिबंधक अधिनियम 2006 चे कलम 9,11 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास धाटाव पोलीस स्टेशन चे पोलिस सब इन्स्पेक्टर श्री.खतीब हे करीत आहेत.

## पेण पोलिसांकडून शहरात अमली पदार्थ विरोधी रॅली

**पेण |** २६ जून अमली विरोधी पदार्थ दिनाचे औचित्य साधून आज पेण पोलिसांकडून शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सोबत घेत संपूर्ण शहरामध्ये रॅली काढण्यात आली.या रॅलीमध्ये मुलांकडून तरुणांनी व्यसनाच्या आहारी जाऊन शरीराची हानी करून घेऊ नका, दारूची नशा करी शरीराची दुर्दशा असा घोषणा दिल्या तर सदर रॅली मार्फत विद्यार्थ्यांनी जनजागृती करून नागरिकांना नशेपासून दूर राहण्याचे आवाहन केले. यावेळी पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांनी सांगितले की कोणतीही नशा ही हानिकारक असून आपल्या शरीराची दुर्दशा करते यामुळेच संपूर्ण कुटुंब उध्वस्त सुद्धा होते त्यामुळे अमली पदार्थ विरोधी मॅसेज हा प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपल्या



मित्र-मैत्रिणींमध्ये सांगून याचे दुष्परिणाम काय असतात याची जनजागृती करणे गरजेचे आहे. सदर रॅली मध्ये पेण प्रायव्हेट हायस्कूल, नेने कन्या शाळा, सार्वजनिक विद्यामंदिर यांसह अन्य शाळांच्या विद्यार्थ्यांनी सहभागी घेतला.यावेळी पेण पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल, उपनिरीक्षक निलेश रजपूत, विक्रम नवरखेडे, संतोष चव्हाण, महिला पोलीस उपनिरीक्षक शिल्पा वेंगुर्लेकर यांच्यासह पोलिस कर्मचारी, शांतता कमिटी सदस्य, शिक्षक वर्ग तसेच पत्रकार उपस्थित होते.

## संत रोहिदास नगर येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप



**तळा |** तळा शहरातील संत रोहिदास नगर येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.रोहिदास समाज मंदिरात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शालेय जीवनात शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे.तसेच विद्यार्थ्यांनी आपली शैक्षणिक प्रगती साधावी या उद्देशाने दरवर्षी संत रोहिदास नगर मध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात येतो. यावेळी संतोष तळकर व उल्हास तळकर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना आपल्या आयुष्यात शिक्षणाला अनन्य साधारण महत्व असून उत्तमप्रकारे शिक्षण घेणे का गरजेचे आहे याबाबत मार्गदर्शन करून उपस्थित विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.तसेच यावर्षी बारावी मध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या कस्तुरी उल्हास तळकर या विद्यार्थिनीला समाजाकडून विविध भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.याप्रसंगी संत रोहिदास नगर ग्रामस्थ सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोर्लई बीचवर जिंदल विद्या मंदिर, साळाव यांच्याकडून स्वच्छतेचा स्फूर्तीदायी उपक्रम

**मुरुड जंजिरा |** "स्वच्छता हीच सेवा" या मंत्राला केंद्रस्थानी ठेवत जिंदल विद्या मंदिर, साळाव यांच्या वतीने कोर्लई समुद्रकिनारी एक प्रेरणादायी स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या उपक्रमाने केवळ किनाऱ्याचा चेहरामोहरा बदलला नाही, तर विद्यार्थ्यांच्या मनामनात पर्यावरणाबद्दलची जाणीवही अधिक दृढ झाली.

शाळेतील सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांचा या मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग होता.हरियाल हार्मनी क्लब, हेरिटेज क्लब आणि कम्युनिटी आउटरीच कौन्सिल अंतर्गत कार्यरत विद्यार्थ्यांनी हाती झाडू घेतले, हातमोजे घातले आणि उत्साहाने किनाऱ्यावरील प्लास्टिक व इतर कचरा गोळा करत "स्वच्छ सागर – सुरक्षित निसर्ग" हा संदेश सर्वत्र पोचवला.

या मोहिमेचे यशस्वी आयोजन



प्राचार्य मुकेश ठाकूर यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे शक्य झाले.पर्यावरण शिक्षणासाठी त्यांची वचनबद्धता आणि अनुभवाधिष्ठित शिकवणीची दृष्टी विद्यार्थ्यांच्या कार्यात ठळकपणे दिसून आली. उपप्राचार्य मंगेश बमनोटे यांच्या प्रभावी समन्वयामुळे मोहीम अधिक शिस्तबद्ध आणि प्रभावी झाली.

शिक्षिका आफी बाशा, मेहविश तांडेल आणि . अश्विनी कांबळे यांनी विद्यार्थ्यांना निसर्गाबद्दल प्रेम, जबाबदारी आणि संवेदनशीलता शिकवली. सहाय्यक कर्मचारी राकेश पाटील यांनीही आपल्या योगदानाने हा उपक्रम अधिक सशक्त केला.

या मोहिमेमुळे विद्यार्थ्यांमध्ये केवळ स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण झाली नाही, तर पर्यावरण जपण्याचा एक सशक्त संदेशही रुजवला गेला. या स्वच्छता मोहिमेतून सुमारे तीन किलोमीटर समुद्र किनारा स्वच्छ करण्यात आला.मोठ्या समुद्र लाटांमुळे या किनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात कचरा किनाऱ्यावर आला होता.या स्वच्छता मोहिमेतून सुमारे एक टन पेक्षा जास्त कचरा संकलित करून त्याची योग्य ती विल्हेवाट लावण्यात आली.

## मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा

### प्रथम क्रमांक मानांकित रा.जि.प.आदर्श केंद्रशाळा खडकोली या ठिकाणी शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम संपन्न

**माणगाव |** शनिवार दिनांक 28 जून 2025 रोजी रा.जि. प. आदर्श केंद्रशाळा खडकोली ता. माणगाव जि. रायगड या ठिकाणी सन्माननीय श्री सुनीलजी गव्हाणे साहेब यांच्या आर्थिक सहकार्याने मुंबईकर मंडळ, सुरत मंडळ खडकोली ग्रामस्थ मंडळ खडकोली यांच्या सहकार्याने शालेय शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले शालेय शैक्षणिक साहित्यात लहान वही रजिस्टर वही दुरेघी वही, चाररेघी वही, आलेख वही, उजळणी वही चित्रकला वही, चार्ट पेपर, घोटीव कागद कंपास पेटी, रंगीत खडू, स्केच पेन पेन्सिल पेन कलर पेटी डिश ब्रश लाकडी पट्टी, कार्डपेपर भौमितिक पेटी, प्रश्नसंच



शिष्यवृत्ती परीक्षा प्रज्ञाशोध परीक्षा नवोदय परीक्षा या साहित्याचे वाटप करण्यात आले सदर कार्यक्रमासाठी तुकाराम पवार, शंकर पवार लक्ष्मण गव्हाणे पांडुरंग महाडिक नामदेव राणे तुकाराम पवार दीपक चव्हाण संदेश पवार गणपत राणे, प्रमिला पवार पुष्पलता अंधेरे प्रिया सुतार अंकिता सुतार स्वप्राली सावंत अक्षरा सुतार श्रुती गव्हाणे, किशोरी सुतार, दिव्या लोखंडे, वीरेंद्र शिंदे,यशश्री अंधेरे, ग्रुप ग्रामपंचायत मांगरूळ सरपंच शितल वारीक शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष वृषाली पवार उपाध्यक्ष मोहिनी सुतार अनिता राणे, वैशाली सुतार, अर्पिता महाडिक मुख्याध्यापिका कुंजलता पाटील शिक्षक वर्ग परेश अंधेरे मंगला भोसले विठाबाई लाखाडे व सर्व विद्यार्थी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते

## करंजा रेवस रेड्डी महामार्ग काम बंद यावर जनता ठाम

**उरण |** दिनांक २८ जून २०२५ रोजी चाणजे ग्राम पंचायत कार्यालय करंजा,ता.उरण येथे प्रशासनाचे अधिकारी,करंजा गावांतील सात पाडे व ग्रामपंचायत हद्दीतील बाधित शेतकरी व मच्छीमार यांची बैठक संपन्न झाली.करंजा रेवस रेड्डी महामार्गावरील पुलाचे सुरू केलेले काम ग्रामस्थ व महिलां यांनी बंद पाडले आहे.ते काम सुरू होण्याचे दृष्टिकोनातून तहसीलदार, वरिष्ठ पोलीस अधिकारी जितेंद्र मिसाळ ,MSRDS चे कार्यकारी अधिकारी अनिरुद्ध बोराडे तसेच चिफ इंजिनिअर यांचे उपस्थितीत त्यांचे आग्रहास्तव सरपंच अजय म्हात्रे यांनी मिटिंग बोलावली होती.सदर वेळी उपसरपंच श्रीमती कल्पना पाटील, माजी



सभापती ॲड.सागर कडू, माजी जिल्हा परिषद सदस्य सिताराम नाखवा,ॲड वेदांत नाखवा.आजी माजी ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष व मोठ्या संख्येने ग्रामस्थ व महिला वर्ग उपस्थित होते.सरपंचासह सर्वजन अगोदर नुकसान भरपाई नंतरच काम सुरू यावर ठाम राहिले.कोणत्याही परिस्थितीत नुकसान भरपाई मिळाली पाहिजे आणि नंतरच काम सुरु करा अशी भूमिका बैठकीत ग्रामपंचायतचे सरपंच, सदस्य व ग्रामस्थांनी घेतली.

## नवजात मुलीच्या भवितव्याच्या अनुषंगाने योग्य ती पावले उचलणार - आमदार प्रशांत ठाकूर यांची ग्वाही

### तक्का येथील फुटपाथवर आढळले बास्केटमध्ये ठेवलेले नवजात अर्भक

**पनवेल |** पनवेल शहरातील तक्का परिसरात आज सकाळी एक मन हेलावून टाकणारी घटना उघडकीस आली. मुलींच्या बालगृहाबाहेर फुटपाथवर एका बास्केटमध्ये ठेवलेले नवजात अर्भक आढळून आले, त्यासोबत इंग्रजी भाषेत एक चिठ्ठी सापडली असून बाळाला सांभाळण्यास असमर्थ असल्याचे या चिठ्ठीतून पालकांनी म्हटले आहे. तर या मुलीच्या भवितव्याच्या अनुषंगाने योग्य ती पावले उचलली जातील, अशी ग्वाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिली आहे.

आज सकाळी तक्का परिसरातील नागरिकांना एका बास्केटमधून बाळाच्या रडण्याचा आवाज आला. येथील नागरिकांनी आवाजाच्या दिशेने जाऊन पाहिले असता, त्यांना बास्केटमध्ये एक नवजात बाळ दिसले. नागरिकांनी क्षणाचाही विलंब न लावता तात्काळ पनवेल शहर पोलिसांना या घटनेची माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी बाळाला ताब्यात घेऊन उपचारासाठी पनवेलच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. सध्या बाळाची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली आहे. या चिठ्ठीतून बाळाच्या



पालकांची बिकट मानसिक आणि आर्थिक परिस्थिती समोर आली आहे. मात्र, अशा प्रकारे बाळाला सोडून देणे हा गंभीर गुन्हा असल्याने, पनवेल शहर पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल केला आहे. बाळाच्या पालकांचा शोध घेण्यासाठी तपास सुरू करण्यात आला असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

## मुरुड चे श्रीदत्त मंदीर देवस्थान हे धार्मिक पर्यटन क्षेत्र व्हावे - आमदार महेंद्र दळवी यांचे प्रतिपादन

**मुरुड |** श्रीदत्त देवस्थान हे अवघ्या मुरुडकर शहरवाशीयांचे भूषण असुन योग साधने साठी हा परिसर नितांत सुंदर आहे . हा मंदीर परिसर पर्यटकांना निश्चितपणे आकर्षित करेल . भविष्यात हे देवस्थान धार्मिक पर्यटन क्षेत्र व्हावे असे प्रतिपादन आमदार महेंद्र दळवी यांनी केले . उर्वरित कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले .

प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतून परिसर सुशोभीकरणाची पाहणी करताना आमदार महेंद्र दळवी ट्रस्टींशी संवाद साधताना बोलत होते . यावेळी मुख्य विश्वस्त प्रमोद भायदे



यांच्या हस्ते आमदार दळवी यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला . यावेळी देवस्थान अध्यक्ष प्रमोद भायदे , उपाध्यक्ष वसंत पाटील , सचिव आदेश दांडेकर , खजिनदार रामचंद्र आरेकर , विजय वाणी , उदय चौलकर , अभय दिवेकर , प्रविण बैकर , सिध्देश करंबे , सुशील माळी , अशोक विरकुड व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते .

यावेळी प्रमोद भायदे यांनी प्रादेशिक पर्यटन विकास योजनांतर्गत 3 कोटी रुपयांचा निधी आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नांतुन प्राप्त झाल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली .या निधीमधून मुख्य प्रवेशद्वार , प्रवेशद्वारा पासून मंदीरा पर्यंत चा रस्ता , मुख्य मंदीर स्थानी डागडुजी व नूतनीकरण , संपूर्ण मंदिराच्या सभोवती वॉक वे, वृक्षारोपण , बालकांसाठी उद्यान , खेळणी , मंदीर कार्यालयाचे नूतनीकरण , पायरी मार्ग नूतनीकरण, हायमास्ट दिवे , नजिकच्या जागेत व्हॅली , धबधबा उतरत्या पायऱ्यांवर सुर्यास्त देखावा न्याहळण्यासाठी व ध्यानधारणे साठी आसन व्यवस्था आदी कामे समाविष्ट आहेत . काम

तथापि निधी अभावी काही कामे रखडल्याने आमदार महोदयांनी या कडे द्यावे अशी विनंती केली . भविष्यात संपूर्ण मंदीर परिसरात सरंक्षक भिंत बांधण्याचे प्रस्तावित असुन पर्यटकांना आकर्षण ठरेल असे अध्यात्मिक शक्तीपिठ करण्याचा ट्रस्टींचा मनोदय त्यांनी व्यक्त केला .

## करळफाटा येथील जेएनपीटीचा सर्विस रोड बनला दारुड्यांचा अड्डा.

**उरण |** दिवसेंदिवस उरण तालुक्यात अनेक गुन्हे वाढत असून प्रशासनाचे यावर कोणताही अंकुश राहिलेला दिसत नाही. त्यातच उरण तालुक्यात अनेक ठिकाणी खुलेआम पणे सर्व्हिस रोडवर,सार्वजनिक ठिकाणी मद्यपी व्यसनी लोक बिनधास्तपणे ग्रुप करून दारू पीत असून मोठ्या प्रमाणात नशा सुद्धा करत आहेत. दारू पीत असताना तिथेच गांजा अफू चरसचे सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर सेवन करत आहेत. मात्र त्यांच्यावर कोणतीच कारवाई होताना दिसून येत नाही. उरण तालुक्यातील करळ फाटा हे अति महत्त्वाचे स्थान आहे.उरण मध्ये येण्यासाठी व उरण मधून बाहेर जाण्यासाठी नागरिकांना या



स्टॉप वरूनच पुढचा प्रवास करावा लागतो.त्यामुळे मोठ्या प्रमाणात नागरिक करळ फाट्यावरून प्रवास करीत असतात. गावातील महिला, शाळा कॉलेजमधील मुल-मुली,ज्येष्ठ नागरिक हे देखील इथूनच प्रवास करीत असतात मात्र करळ फाट्यावर जेएनपीटी प्रशासनाच्या सर्विस रोडलगत मदयपी दारुडे हे दारू,गांजा चरस अफू आदी नशेच्या पदार्थ्यांचे सेवन करत आहेत. त्यामुळे व्यसनी लोकांचा वापर येथे मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मद्यपी व्यसनी लोकांची या परिसरात दादागिरी हुकुमशाही वाढली असून सदर मद्यपी व्यसनी व्यक्ती ग्रुप करून एकत्र बसून खुलेआमपणे दारू पीत गांजा ओढत रस्त्यावरच ठाण मांडून बसत आहेत.

## 'हिंदी सक्ती'च्या सरकार निर्णयाची होळी करूया,

**पनवेल |** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव जी बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र द्रोही सरकारच्या मराठी भाषेवर होणाऱ्या आक्रमणा विरोधात हिंदी सक्तीचा जो जीआर भाजप महायुती सरकार ने काढलाय त्या जीआर ची होळी पनवेल तालुक्यातील सर्वपक्षीय नेत्यांच्या वतीने श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळा समोर पनवेल येथे होळी करण्यात आली.



यावेळी महाविकास आघाडी सोबत , शेकापचे मा. आमदार बाळाराम पाटील , शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत , मनसे प्रवक्ता योगेश चिल्ले, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते कॅप्टन कलावत, शिवसेना उपजिल्हा प्रमुख भरत पाटील, शेकापनेते काशिनाथ पाटील,शिरीष बुटाला,शशिकांत डोंगरे, महानगर प्रमुख अवचित राऊत, यांच्या सह सर्वपक्षीय पुरूष पदाधिकारी, महिला आघाडी पदाधिकारी, युवासेना पदाधिकारी तसेच मराठी प्रेमी नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आदई ग्रामपंचायत हद्दीतील नागरी आरोग्य केंद्र सुरु करण्याची मनसेची मागणी

**नवीन पनवेल |** आदई ग्रामपंचायत हद्दीतील नागरी आरोग्य केंद्र सुरू करण्याची मागणी मनसेचे पनवेल तालुका उपाध्यक्ष सुजित पावलस सोनवणे यांनी तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती पनवेल यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. आदई ग्रामपंचायत हद्दीतील अनेक ठिकाणी ताप, डोकेदुखी, सर्दी व खोकला या आजाराचे रुग्ण आढळून आलेले आहेत. हा आजार संसर्गजन्य असल्याने अनेक रुग्ण वाढत आहेत. जिल्हा परिषद दवाखाना लांब असल्याने या ठिकाणी रुग्णांना अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे येत्या पंधरा दिवसांमध्ये आदई विभागामध्ये नागरी आरोग्य केंद्र सुरू करावे जेणेकरून अनेकांना याचा लाभ घेता येईल. यासाठीचे निवेदन मनसेचे सुजित सोनवणे यांनी तालुका आरोग्य अधिकारी यांना दिले आहे.



पनवेल शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांचे वाढदिवसानिमित्त भाजपा उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितिन पाटील यांनी अभिष्टचिंतन केले. या वेळी त्यांच्या सोबत भाजपा पनवेल शहर पदाधिकारी रुपेश नागवेकर, प्रितम म्हात्रे, केदार भगत, उमेश इनामदार, प्रशांत पाटील आदी उपस्थित होते.

## रोहा तालुक्यातील ग्रामपंचायत वाशी आदिशक्ती अभियान समिती अध्यक्षपदी सौ. संचिता मगर

**रोहा |** नुकतीच माझी लाडकी बहीण योजना राज्य सरकारने सुरू केली आहे. त्यातच महिला सक्षमीकरण करण्यासाठी राज्य सरकारने आदिशक्ती अभियान ही योजना ग्रामपंचायत स्तरावर सुरू केली आहे. या अभियानांतर्गत महिला विकास विषयक कार्य म्हणजेच बालविवाह रोखणे, हुंडा पद्धती बंद करणे, महिला संरक्षण, गावातील एकल महिला, विधवा, परित्यक्ता व निराधार महिलांच्या सुरक्षिततेसाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. महिला सक्षमीकरण विषयक कार्य अंतर्गत महिला बचत गटांची निर्मिती व सक्षमीकरणासाठी, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या मदतीने कौशल्य



आयटी दिली विकासाचे प्रशिक्षण देण्याचे कार्य करण्यात येणार आहे. या अनुषंगाने वाशी ग्रामपंचायतीने आदिशक्ती अभियान समिती स्थापन केली असून, या समितीच्या अध्यक्षपदी सौ. संचिता मगर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या जाणीच जागृती कार्यक्रमांतर्गत कायदे, योजना व त्यांची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणा व सुविधा याचाबत प्रबोधन करण्यात येणार आहे.

## फसव्या महाविकास आघाडी राहण्यापेक्षा भाजपामध्ये प्रवेश केला : पंडित पाटील

**रोहा |** देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाचे सरकार आहे आणि राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सरकार असल्याने या महाराष्ट्रातील गोरगरीब जनतेला लाभ मिळत आहे . अगदी शेवटच्या घटकापर्यंत योजना शासनाच्या आहेत . गेली 45 वर्ष मी सत्तेच्या विरोधात कष्टकरी शेतकऱ्यांसाठी व गोरगरिबांच्या हितासाठी काम करत होतो परंतु अशा फसव्या महाविकास आघाडीमध्ये राहण्यापेक्षा लोकशाही मानणारा भारतीय जनता पक्षामध्ये मी प्रवेश केला व आगामी काळात दक्षिण रायगडमध्ये भारतीय जनता पक्ष संघटना मजबूत करून येणाऱ्या काळात क्रमांक एकचा पक्ष असणार आहे असे भारतीय जनता पार्टीचे माजी आमदार पंडित पाटील यांनी रोहा भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्याशी संवाद साधताना शनिवार दि. (२८) रोजी रोहा शासकीय विश्रामगृहात उपस्थित कार्यकर्त्यांना आश्वासित केले . तर दर महिन्याला रोहा शहरातील भारतीय जनता पार्टी




कार्यालयात जनता दरबार असल्याची माहिती पाटील यांनी दिली आहे.

दरम्यान शेतकरी कामगार पक्षातून भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केल्यानंतर आज पहिल्यांदाच रोह्याच्या कार्यकर्त्यांशी पंडित शेठ पाटील यांनी संवाद व व त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती . या बैठकीत येणाऱ्या निवडणुकीच्या अनुषंगाने कार्यकर्त्यांशी चर्चा केली त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये एक नव चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे . परंतु कष्टकरी गरीब जनतेची नाळ ओळखणारा नेतृत्व पंडित शेठ पाटील मिळाले आहेच त्यांचा दांडगा अनुभव व व प्रशासकीय अधिकारावर असणं वचक याचा फायदा देखील निश्चित भारतीय जनता पक्षाला मिळणार आहे.

त्यावेळी पाटील यांनी सांगितले की ,आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने पक्ष बांधणी नुसार प्रत्येक पदाधिकाऱ्याने झोपून देऊन पक्षाचं काम प्रामाणिकपणे केला पाहिजे तरच येणार सर्व निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टी ताकद निश्चित वाढलेले असेल . रोहा तालुक्यातील तिनी मंडळ अध्यक्षांनी आपल्या भागातील केलेली विकास काम किती खरे आहेत किती खोटी आहेत माहिती केली गेली पाहिजे तसेच आपल्या आजूबाजूच्या लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी दर महिन्याला जनता दरबार तर घेऊच परंतु एमआयडीसी , पंचायत समिती व तहसील कार्यालय सर्व अधिकाऱ्यांच्या वरिष्ठांच्या सूचनेनुसार लवकरच बैठका घेऊन गोरगरिबांची व पदाधिकाऱ्यांची समस्या सोडविल्या जातील असा विश्वास देखील यावेळी पंडित पाटील यांनी कार्यकर्त्यांना दिला

# हाजी अली समुद्रात अस्थी विसर्जन करताना दोघांचा मृत्यू, एकाला वाचवले

**मुंबई, दि. २९ : प्रतिनिधी**

मुंबईतून एक अत्यंत दुर्दैवी घटना समोर आली आहे. शनिवारी अस्थी विसर्जनासाठी गेलेले तिघेजण हाजी अली येथील समुद्रात बुडाले. यातील दोघांचा मृत्यू झाला तर एकाला वाचवण्यात यश आलं. स्थानिक मच्छिमार आणि पोलिसांच्या मदतीने तिघांनाही बाहेर काढून रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. मात्र दोघांना डॉक्टरांनी मृत घोषित केले. वाचलेल्या व्यक्तीवर सध्या रुग्णालयात उपचार सुरु आहेत. दरम्यान पावसामुळे समुद्र खवळलेला असून लोकांनी समुद्रकिनाऱ्यावर जाऊ नये, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आलं आहे.



वरळीच्या हाजी अली समुद्रकिनाऱ्यावर शनिवारी संध्याकाळी ५.४५ च्या सुमारास अस्थी विसर्जनासाठी गेलेले तीनजण वाहून गेल्याची घटना घडली. या दुर्घटनेत दोघांचा मृत्यू झाला, तर एकजण वाचला. संतोष विश्वेश्वर (५१) आणि कुणाल कोकाटे (४५) अशी मृतांची नवे आहेत. तर, संजय सरवणकर यांची प्रकृती स्थिर आहे. तिघे बुडाल्याची माहिती मिळाल्यानंतर मच्छीमारांच्या मदतीने पोलिसांनी त्यांना वाचवले आणि उपचारासाठी नायर रुग्णालयात पाठवले. मात्र, दोघेजण मरण पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. लोटस जेट्टी, हाजीअली येथे हे तिघे गेले होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्थानिक मच्छिमारांच्या मदतीने तिघांना बाहेर काढल्यानंतर त्यांना ताबडतोब नायर रुग्णालयात नेण्यात आले.तिघांपैकी दोघांना डॉक्टरांनी मृत घोषित केले. एक व्यक्ती जिवंत होती आणि त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले, अशी माहिती ताडदेव पोलिसांनी दिली. मृत नातेवाईकाच्या अस्थी विसर्जनासाठी तीन लोक समुद्रकिनाऱ्यावर पोहोचले होते. यावेळी समुद्राच्या लाटांमध्ये तोल गेल्याने तिघेही वाहून गेले. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, समुद्रात अचानक आलेल्या जोरदार लाटांमुळे तिघांचाही तोल गेला आणि ते खोल पाण्यात गेले.

दरम्यान, पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला असून घटनास्थळी उपस्थित असलेल्या कुटुंबातील सदस्यांची आणि प्रत्यक्षदर्शींची चौकशी केली जात आहे. प्रशासनाने नागरिकांना समुद्र किंवा पाणवठ्यांजवळ धार्मिक विधी करताना अत्यंत सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे. तसेच, हाजी अलीसारख्या सार्वजनिक ठिकाणी सुरक्षा उपायांचा आढावा घेण्याचे आणि ते मजबूत करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

# बांगलादेशींना नोकरी देणाऱ्यांवर होणार कारवाई; राज्य सरकारच्या आदेश

**मुंबई, दि. २९ : प्रतिनिधी**

कोणतीही कंपनी, उद्योग वा अन्य आस्थापनांमध्ये बांगलादेशी नागरिकास नोकरी दिल्याचे आढळले तर संबंधित मालकांना जबाबदार धरून कारवाई केली जाणार आहे. गृह विभागाने बांगलादेशी नागरिकांना वेसण घालण्यासाठी एक परिपत्रक जारी केले आहे.



बांगलादेशी घुसखोर हे कमी मजुरीवर काम करायला तयार असतात. कमी पैशात नोकर मिळतात म्हणून बरेचदा नागरिकत्व न तपासता बांगलादेशी नागरिकांना काम दिले जाते. मात्र अशा घुसखोरांमुळे राज्याची व पर्यायाने देशाची सुरक्षितता धोक्यात येते. त्यामुळे त्यांना अजिबात कामावर ठेवू नये आणि सर्व प्रशासकीय विभागांनी त्याबाबत आपापल्या अधिपत्याखालील कार्यालयांना सतर्क करावे असे परिपत्रकात म्हटले आहे. या पत्रकामुळे घुसखोरांविरोधातील कारवाईला आणखी वेग येणार आहे.

**स्वतंत्र यादी तयार करावी**

बनावट कागदपत्रांच्या आधारे, मूळ प्रमाणपत्रांमध्ये खाडाखोड करून कागदपत्रे तयार करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांची स्वतंत्र यादी तयार करावी आणि ती संबंधित शासकीय विभागांनी आपापल्या वेबसाईटवर प्रसिद्ध करावी.

अशा नागरिकांची यादी जाहीर झाल्याने अन्य शासकीय कार्यालये सतर्क होतील आणि त्यांना कोणतीही प्रमाणपत्रे देणार नाहीत असे स्पष्ट करण्यात आले आहे.

**पोलीस पाटलांना माहिती देण्याचे निर्देश**

विविध शासकीय योजनांमध्ये व्यक्तिगत लाभ घेणाऱ्या व्यक्तीकडून वैयक्तिक हमीपत्र घेण्यात येत असते. अशा हमीपत्रात ती व्यक्ती भारतीय नागरिक नसल्याचे व खोट्या कागदपत्रांच्या आधारे योजनांचा लाभ घेतल्याचे आढळल्यास त्या व्यक्तीवर तत्काळ फौजदारी कारवाई केली जाईल.

विविध शासकीय विभागांकडून देण्यात येणाऱ्या शासकीय दस्तऐवज, प्रमाणपत्र बांगलादेशी घुसखोरांना बनावट कागदपत्रांच्या आधारे देण्यास मदत करणाऱ्यांविरुद्धदेखील फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे.

बनावट कागदपत्रे आढळल्यास ती संबंधित विभागाने तत्काळ रद्द करावीत. ग्रामीण भागात एखादा बांगलादेशी घुसखोर वा संशयित व्यक्ती आढळल्यास पोलीस पाटलांनी त्याची माहिती पोलीस ठाण्याला तत्काळ द्यावी, असेही परिपत्रकात म्हटले आहे.

# कचऱ्यातील पिस्तुलाने 12 वर्षीय मुलाकडून झाले मिसफायर

**मुंबई, दि. २९ : प्रतिनिधी**

कचऱ्यात सापडलेल्या पिस्तुलाने एका १२ वर्षीय मुलाने एक राउंड फायर केल्याची घटना दहिसर पूर्वकडील घरटन पाडा येथे घडली आहे. या घटनेत कोणीही जखमी झालेले नाही. मात्र, या प्रकारामुळे तेथे खळबळ उडाली आहे. दहिसर पोलिसांनी या प्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

दहिसर पोलिस ठाण्याच्या बीट क्रमांक २ चे हवालदार कदम यांना या घटनेची माहिती मिळाली होती.



त्यानुसार त्यांनी घटनास्थळी धाव घेतली असता घरटन पाडा क्रमांक २ येथील साईकृपा चाळीच्या पूर्वेकडील मैदानाजवळ कचऱ्यात बेवारस स्थितीत एक पिस्तूल व चार काडतुसे सापडल्याचे समजले.

चौकशीत ते पिस्तूल त्या परिसरात राहणाऱ्या एका १२ वर्षांच्या मुलाने खेळताना पाहिले. ते खेळण्यातील पिस्तूल असल्याचे समजून त्याने त्याचा ट्रिगर ओढल्याने त्यातून चुकून एक राउंड फायर झाला. या घटनेमध्ये कोणालाही दुखापत झाली नाही. या घटनेची गंभीर दखल घेत परिमंडळ १२ चे पोलिस उपायुक्त महेश चिमटे आणि दहिसर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक होनमाने यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने पिस्तूल व चार काडतुसे ताब्यात घेतली.

# मुंबईत पशू-पक्ष्यांचा जीव वाचवण्याचे काम वाढले!

**मुंबई, दि. २९ : प्रतिनिधी**

मुंबई अग्निशमन दलाचे पक्षी व प्राण्यांचा जीव वाचवण्याचे काम वाढले असून गेल्या वर्षभरात पक्षी व प्राणी यांची सुटका करण्यासाठी विविध अग्निशमन केंद्रांमध्ये 5 हजारपेक्षा जास्त कॉल आले. 10 ते 15 वर्षांपूर्वी वर्षभरात जेमतेम 500 ते 600 कॉल येत होते. मुंबई शहरात पक्षी व प्राणी मित्रांची संख्या वाढत असल्यामुळे गेल्या तीन-चार वर्षांपासून झाड व विद्युत केबलवर अडकलेल्या पक्ष्यांना तर नाले व गटारात पडलेल्या प्राण्यांची सुटका करण्यासाठी दररोज शेकडो फोन येतात. त्यामुळे अग्निशमन दलाला पक्षी व प्राणी वाचवण्यासाठी आपली यंत्रणा कामाला लावावी लागत आहे.

कॉल आल्यानंतर अग्निशमन दलाची एक गाडी किमान चार ते पाच जवानांसह घटनास्थळी पोहचते. विद्युत केबल व झाडावर अडकलेल्या पक्षाला वाचवण्यासाठी अग्निशमन दलाच्या जवानांना जीव धोक्यात घालावा लागत आहे.



पक्ष्याला वाचवण्यासाठी शिडीवर चढून काठीचा आधार घ्यावा लागतो. त्यामुळे तोल जाऊन अग्निशमन जवान पडण्याची शक्यता असते. यासाठी पालिकेने 2018 मध्ये बर्ड रेसक्यु टेलिस्कोपीक रॉड खरेदी केले होते. अग्निशमनकडे असलेले अनेक रॉड निकामी असून सध्या अग्निशमन दलाच्या जवानांना पूर्वीप्रमाणे काठीनेच पक्षांना वाचवावे लागत आहे. त्यामुळे नवीन रॉड खरेदी करण्यासाठी अग्निशमन दलाने पालिका प्रशासनाकडे परवानगी मागितली होती. त्यानुसार 57 बर्ड रेसक्यू टेलिस्कोपीक रॉड खरेदी करण्यात येणार असून यासाठी 2 कोटी 15 लाख रुपये खर्च येणार आहे.

टेलिस्कोपिक पद्धतीने बंद होणारे, कमी वजनाचे, 16 फूट उंचीपर्यंत पोहोचणारे बर्ड रेसक्यू टेलिस्कोपीक रॉड अग्निशमन दलाच्या 35 केंद्रांमध्ये वितरित करण्यात येणार आहेत. या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबवण्यात आली असून महिन्याभरात हे रॉड उपलब्ध होणार आहेत.

**दरवर्षी 15 हजार आपत्तींचा करावा लागतो सामना**

मुंबईतील नागरिकांच्या जिविताचे व संपत्तीचे आगीपासून व अन्य दुर्घटनेपासून संरक्षण करण्याचे बंधनकारक कर्तव्य अग्निशमन दलामार्फत पार पाडले जाते. मुंबई व उपनगरात दरवर्षी 15 हजारापेक्षा जास्त आपत्कालीन परिस्थितीचा अग्निशमन दलाचे जवान सामना करतात. यामध्ये आग लागणे, अपघात, झाड पडणे, बूडणे, रसायानांची गळती, तेल सांडणे, घर कोसळणे आदी दुर्घटनांचा समावेश असतो. त्यात आता पक्षी व प्राण्यांना वाचवण्याचे काम वाढले आहे. शहरात दररोज किमान 10 ते 12 कॉल पक्षी व प्राणी वाचवण्यासाठी येत असल्याचे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

# चाकरमान्यांसाठी गुडन्यूज! कोकण रेल्वे देणार 'रो-रो' सेवा
## गणपतीत तुमची कारही जाईल ट्रेनने कोकणात

**नवी मुंबई, दि. २९ : प्रतिनिधी**

कोकण रेल्वे महामंडळ येत्या गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर खास रोल ऑन/रोल ऑफ रेल्वे सेवा सुरू करण्याचा विचार करत आहे.

ही सेवा कार वाहतुकीसाठी उपलब्ध करून दिली जाईल, अशी माहिती KRCL चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक संतोषकुमार झा यांनी मंगळवारी बेलापूर (नवी मुंबई) येथील मुख्यालयात पत्रकार परिषदेत दिली.

झा यांनी स्पष्ट केलं की, "जर किमान 40 कार्स एकावेळी वाहतूक करण्यासाठी उपलब्ध झाल्या, तर आम्ही ही विशेष सेवा नक्की सुरू करू."

**ट्रकनंतर आता कार्ससाठीही रो-रो?**

कोकण रेल्वेची रो-रो सेवा प्रामुख्याने ट्रक वाहतुकीसाठी वापरली जाते, जिथे वाहन चालकही स्वतःच्या वाहनासोबत प्रवास करू शकतो. मात्र, कार वाहतुकीसाठी रो-रो सेवा यापूर्वी सुरु करण्यात आलेली नव्हती. "मला कल्पनाच नव्हती की लोकांना त्यांची महागडी कार 750 किमी दूर नेण्याची गरज भासते," असे झा म्हणाले.

कार वाहतुकीसाठी विशिष्ट डब्यांत बदल करावे लागतील, हे त्यांनी मान्य केले असून, या गणपतीत विशेष ट्रेन जाहीर करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

**2023-24 मध्ये नफा; नव्या प्रकल्पांचे मूल्य 7200 कोटी रुपये**

झा यांनी दिलेल्या माहितीनुसार, 2023-24 या आर्थिक वर्षात कोकण रेल्वेने 301 कोटींचा नफा कमावला आहे. कोविड काळातील दोन वर्षे वगळता महामंडळ सातत्याने नफ्यात आहे. मागील 15 महिन्यांत महामंडळाने 3150 कोटींचे प्रकल्प निविदेद्वारे मिळवले असून सध्या 4087 कोटींचे प्रकल्प कार्यान्वित आहेत.

"या वर्षात आम्ही 15000 कोटींचे नवीन ऑर्डर्स मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे आणि मला पूर्ण विश्वास आहे की ते साध्य होईल," असं झा यांनी सांगितलं.

**प्रवासी सुविधांवर 125 कोटींचा खर्च**

येत्या तीन वर्षांत प्रवाशांसाठी प्लॅटफॉर्म विस्तार, फूटओव्हर ब्रिज (FOB), रिटायरींग रूम्स अशा विविध सुविधा निर्माण करण्यासाठी ₹125 कोटींची गुंतवणूक केली जाणार आहे.




महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभागाने 11 स्थानकांच्या विकासासाठी ₹99 कोटी खर्च केले आहेत. याशिवाय, रत्नागिरी स्थानकासाठी केवळ MIDC मार्फत ₹39 कोटींची गुंतवणूक होत आहे. "या वर्षाअखेरीस रत्नागिरी स्थानकाचा संपूर्ण कायापालट तुम्हाला पाहायला मिळेल," असंही झा यांनी सांगितलं.

**8 थांबे पुन्हा सुरू होणार?**

कोविड काळात बंद करण्यात आलेले 8 स्थानक थांबे पुन्हा सुरू करण्याचा प्रस्ताव रेल्वे बोर्डाकडे पाठवण्यात आला आहे. तसेच, पर्नेम व ओल्ड गोवा बोगद्यांसाठी पर्यायी मार्गांचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला असून कार्यवाटपाची प्रतीक्षा असल्याचंही झा यांनी स्पष्ट केलं.

**रेल्वे दुपदरीकरणासाठी ₹5100 कोटींचा प्रस्ताव**

सध्या संपूर्ण कोकण रेल्वे मार्ग एकेरी असून, केवळ 47 किमीचा भाग दुहेरी आहे. उर्वरित मार्गासाठी "patch doubling" करण्याचा ₹5100 कोटींचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मंजुरीसाठी पाठवण्यात आला आहे.

**कर्ज फेडीसाठीही योजना**

कोंकण रेल्वेवर सध्या ₹2750 कोटींचं कर्ज असून, यावर्षात ₹600 कोटींची रक्कम फेडण्याचा निर्धार महामंडळाने केला आहे.

# विमानतळावर 16 दुर्मीळ प्रजातींचे साप जप्त

**मुंबई, दि. २९ : प्रतिनिधी**

बॅंकॉकहून एका प्रवाशाने तस्करी करून आणलेले १६ दुर्मिळ प्रजातीचे साप सीमा शुल्क विभागाने जप्त केले आहे. याप्रकरणी एका प्रवाशावर गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.

एक प्रवासी थायलंडच्या बॅंकॉकहून मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरला होता. विमानतळावर सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी त्याला अडवून चौकशी केली. विचारपूस सुरू असताना तो प्रवासी अस्वस्थ झाला होता तसेच त्याच्या हालचाली संशयास्पद आढळून आल्या. त्यामुळे त्याच्या सामानाची तपासणी करण्यात आली.

तपासणीअंती या प्रवाशाच्या सामानात दुर्मीळ प्रजातीचे एकूण १६ साप आढळले. त्यात २ गार्टर, ५ राईनोसोरस रॅट, १ अल्बिनो रॅट, २ केनियन सॅण्ड बोआ, १ कोस्टल बॅंडेड कॅलिफोर्निया किंग आणि ५ अल्बिनो होंडुरन मिल्क सापांचा समावेश आहे. हे सर्व साप जिवंत होते. त्याने ते सामानात लपवून आणले होते. पंचनामा करून तस्करी केलेले प्राणी जप्त करण्यात आले आहेत. या सापांची लाखो रुपयांना विक्री करण्यात येते.

# अभिनेत्री रिमी सेन व निर्माता सुभ्रत रे यांची साडेतीन कोटींची फसवणूक

**मुंबई, दि. २९ : प्रतिनिधी**

अभिनेत्री रिमी सेन व तिचा व्यावसायिक भागिदार, चित्रपट निर्माता सुभ्रत रे यांचा विश्वास संपादन करून साडेतीन कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार घडला आहे. आरोपी मालाड येथील रहिवासी असून त्यांनी कूट चलनात गुंतवणूकीतून महिन्याला ८ ते १० टक्के परतावा देण्याच्या नावाखाली फसवणूक केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी खार पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चित्रपट निर्माता निभ्रत रे यांच्या तक्रारीवरून याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अभिनेत्री रिमी सेन हिने हंगामा, धूम, हेराफेरी, गोलमाल सारख्या चित्रपटांत काम केले आहे. तक्रारनुसार, निभ्रत रे व त्यांची मैत्रिण रिमी सेन यांची मामोलो फिल्म नावाची कंपनी आहे. रिमी सेने हिची २०१३ मध्ये आरोपीशी ओळख झाली. त्याने बक्षीस समारंभात तिला बोलावले होते. रिमी मार्फत सुभ्रत यांचीही आरोपी व्यावसायिकाशी ओळख झाली. त्याने त्याचा मुलगा व मुलगी कूट चलनात गुंतवणूकीतून चांगला नफा कमवून देत असल्याचे सांगितले. त्यांनी कार्यालयात नेऊन गुंतवणूकीबाबतची माहिती दिली. आरोपीने महिन्याला ८ ते १० टक्के नफा कमवून देण्याचे आमीष दाखवले. त्यानुसार सुभ्रत रेने २०२० मध्ये आरोपीने सांगितलेल्या खात्यावर २० लाख रुपये जमा केले. त्यानंतर जानेवारी २०२१ ते ऑक्टोबर २०२१ या कालावधीत मामोलो फिल्मच्या खात्यातून एक कोटी तीन लाख जमा करण्यात आले.

विविध व्यवहाराद्वार त्यांनी एकूम तीन कोटी ५८ लाख रुपये आरोपीने सांगितल्याप्रमाणे जमा केली. त्याद्वारे चार लाख ४७ हजार अमेरिकन डॉलर्स मूल्याच्या कूट चलनात आरोपींनी व्यवहार करण्यास सुरूवात केला. ती रक्कम सात लाख ३५ हजार अमेरिकन डॉलर्स झाली. त्यावेळी रे यांनी त्यातील गुंतवलेले चाल लाख ४७ हजार अमेरिकन डॉलर्स काढून उर्वरीत रक्कमेचे ट्रेडींग करण्यास सांगितले. पण आरोपीने नकार दिला. ती रक्कम लवकरच १० लाख अमेरिकन डॉलर्स होईल, असे त्यांना सांगण्यात आले.

# बेळगाव स्मार्ट सिटीमध्ये महाराष्ट्राची दादासाहेब फाळके चित्रनगरी एनडी स्टुडिओतून नवा कलाप्रकल्प साकारायला सुरुवात

**मुंबई, दि. २९ : प्रतिनिधी**

बेळगाव स्मार्ट सिटीमध्ये महाराष्ट्राच्या दादासाहेब फाळके चित्रनगरीचा नवा भव्य कलाप्रकल्प उभारण्याचे काम अखेर पुन्हा सुरू झाले आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या उपस्थितीत आज या प्रकल्पाचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला. कला दिग्दर्शक नितीन देसाई यांच्या संकल्पनेतून, एनडी स्टुडिओच्या माध्यमातून तब्बल साडेतीन एकर जागेत हा प्रकल्प साकारण्यात येणार आहे. काही तांत्रिक कारणांमुळे रखडलेल्या या प्रकल्पाला नितीन देसाई यांच्या निधनानंतर मोठा धक्का बसला होता. मात्र, एनडी स्टुडिओचा ताबा महाराष्ट्र शासनाने घेतल्यानंतर आता पुन्हा या प्रकल्पाला नवे बळ मिळाले आहे.




या प्रकल्पात भारतातील पाच प्रांतांची खेडी, हवाई दालन, कलाप्रदर्शन अशी वैविध्यपूर्ण मांडणी करण्यात येणार आहे. संस्कृती आणि आधुनिकतेचा संगम घडवणारा हा कलाप्रकल्प गोरेगाव फिल्मसिटीच्या माध्यमातून उभारण्यात येणार आहे.

या प्रसंगी गोरेगाव चित्रनगरीचे सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, वित्तीय सल्लागार चित्रलेखा खातू, व्यवस्थापकीय संचालिका स्वाती म्हसे पाटील, बेळगाव स्मार्ट सिटीच्या सयीद अफरीन तसेच स्थानिक आमदार अभय पाटील यांची उपस्थिती होती.

प्रकल्प मार्गी लावण्यासाठी अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या समन्वयामुळेच हे काम पुन्हा सुरू होऊ शकले, असे मंत्री आशिष शेलार यांनी यावेळी स्पष्ट केले.

हा नवा प्रकल्प केवळ बेळगावसाठीच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद ठरेल, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

# मराठी सन्मान मोर्चात काँग्रेसचा सहभाग-सकपाळ

**मुंबई, दि. २९ : प्रतिनिधी**

राज्य शिक्षण मंडळाच्या मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळेत इयत्ता पहिलीपासून त्रिभाषा सूत्र लागू करण्याच्या विरोधात काढण्यात येणाऱ्या मोर्चात काँग्रेस सहभागी होणार असल्याचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी शुक्रवारी केले आहे. मनसे आणि शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडून हिंदी सक्तीविरोधात मोर्चा काढला जाणार आहे. आधी ठाकरे गट आणि मनसेकडून वेगवेगळे मोर्चे काढले जाणार होते. मात्र या मुद्यावर सर्व पक्ष, संस्था, साहित्यिक आणि मराठी प्रेमींचा एकच मोर्चा निघावा अशी काँग्रेसची भूमिका होती, असे सकपाळ यांनी याबाबत बोलताना सांगितले.

काँग्रेसने मराठी सन्मान मोर्चात सहभागी व्हावे यासाठी मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्यावतीने बाळा नांदगावकर यांनी काँग्रेसचे नेते विजय वड्डेटीवार यांना संपर्क केला होता. मराठीसाठी एकत्र येण्याची ही वेळ आहे. ही हाक पक्षाने नाही तर भाषेने दिली आहे, असे याबाबत माहिती देताना वड्डेटीवार यांनी म्हटले आहे.

उद्धव ठाकरे गटाकडून संजय राऊत यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांच्याशी चर्चा करून मोर्चात सहभागी होण्याचे निमंत्रण दिले होते. त्यावेळी मराठी भाषेसाठी एकच मोर्चा काढण्याबाबत चर्चा झाल्याचे सकपाळ यांनी सांगितले.

हा राजकारणाचा विषय नाही तर हा मराठी संस्कृती आणि महाराष्ट्र धर्माचा विषय आहे. ही पक्षाची भूमिका असण्यापेक्षा महाराष्ट्राची भूमिका असली पाहिजे. त्यासाठी या विषयावर काढणाऱ्या मोर्चात आम्ही सहभागी होऊ, असे आम्ही सांगितले आहे. पक्षाच्या पलिकडे, सर्व मराठी प्रेमींनी याकडे बघितले पाहिजे, असेही सकपाळ म्हणाले.

दरम्यान, पहिलीपासून त्रिभाषा सूत्र लागू करण्याच्या निर्णयाविरोधातील मोर्चाला राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने पाठिंबा दिला आहे.राज्य सरकार महाराष्ट्रात जी हिंदी सक्ती लादू इच्छित आहे त्याविरोधात ५ जुलै २०२५ रोजी मुंबईतील गिरगाव चौपाटीवरून मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. प्रत्येक मराठी माणसाने या मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केले आहे.

महासागर



# गणपतीत तुमची कारही जाईल ट्रेनने कोकणात

**मुंबई दि. २९ प्रतिनिधी**

कोकण रेल्वे महामंडळ येत्या गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर खास रोल ऑन/रोल ऑफ (Ro-Ro) रेल्वे सेवा सुरू करण्याचा विचार करत आहे.

ही सेवा कार वाहतुकीसाठी उपलब्ध करून दिली जाईल, अशी माहिती केआरसीएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक संतोषकुमार झा यांनी मुख्यालयात पत्रकार परिषदेत दिली. झा यांनी स्पष्ट केलं की, "जर किमान ४० कार्स एकावेळी वाहतूक करण्यासाठी उपलब्ध झाल्या, तर आम्ही ही विशेष सेवा नक्की सुरू करू." कोकण रेल्वेची रो-रो सेवा प्रामुख्याने ट्रक वाहतुकीसाठी वापरली जाते, जिथे वाहन चालकही स्वतःच्या वाहनासोबत प्रवास करू शकतो. मात्र, कार वाहतुकीसाठी रो-रो सेवा यापूर्वी सुरु करण्यात आलेली नव्हती. "मला कल्पनाच नव्हती की लोकांना त्यांची महागडी कार ७५० किमी दूर नेण्याची गरज भासते," असे झा म्हणाले. कार वाहतुकीसाठी विशिष्ट डब्यांत बदल करावे लागतील, हे त्यांनी मान्य केले असून, या गणपतीत विशेष ट्रेन जाहीर करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. झा यांनी दिलेल्या माहितीनुसार, २०२३-२४ या आर्थिक वर्षात कोकण रेल्वेने ३०१ कोटींचा नफा कमावला आहे. कोविड काळातील दोन वर्षे वगळता महामंडळ सातत्याने नफ्यात आहे. मागील १५ महिन्यांत महामंडळाने ३१५० कोटींचे प्रकल्प निविदेद्वारे मिळवले असून सध्या ४०८७ कोटींचे प्रकल्प कार्यान्वित आहेत.

# एकल महिलांची सुरक्षा, रोजगार आणि आर्थिक स्वावलंबनासाठी धोरणात्मक उपाययोजना आखणे आवश्यक - डॉ. निलम गोऱ्हे

**मुंबई दि. २९ प्रतिनिधी**

राज्यातील एकल महिलांसाठी सुरक्षा, रोजगार आणि आर्थिक स्वावलंबनाबाबत धोरणात्मक उपाययोजना अंमलात आणणे आवश्यक आहे. यासाठी महसूल, अन्न व नागरी पुरवठा, महिला व बालविकास विभाग, आरोग्य, रोजगार हमी योजना आणि ग्रामविकास विभागामार्फत एकल महिलांचा डेटा संकलित करून, त्यांना प्राधान्यक्रम देणाऱ्या योजना राबवाव्यात असे निर्देश उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांनी दिले.

एकल महिलांच्या समस्या आणि उपाययोजना संदर्भात विधानभवन येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपसभापती डॉ. गोऱ्हे बोलत होत्या. बैठकीस सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा, महिला व बालविकास विभागाच्या आयुक्त नैना गुंडे, महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त आर. विमला, उपायुक्त राहुल मोरे, आदिवासी विकास विभागाचे सह सचिव मच्छिंद्र शेळके, रोजगार हमी योजनेचे सह सचिव अतुल कोदे, साऊ एकल महिला पुनर्वसन समितीचे राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी, सदस्य मिलिंद साळवे उपस्थित होते.

उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे म्हणाल्या, विधवा , घटस्फोटित, परित्यक्त्या, अविवाहित अशा एकल महिलांना सामाजिक आणि आर्थिक समस्यांचा सामना करावा लागतो. त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न महत्वाचा असून, आत्मसन्मान, स्वाभिमान, कायदेशीर जागृती, मालमत्ता स्वातंत्र्य याबाबत ठोस उपाययोजना राबविण्यात यावी.



शाश्वत विकास उद्दीष्टांवर काम करणे आवश्यक आहे. यासाठी महिलांना विविध योजनेचा लाभ देणाऱ्या विविध शासकीय विभागांशी समन्वय साधून एकल महिलांची माहिती संकलीत करण्यात यावी. याआधारे एकल महिलांना प्राधान्याने विविध शासकीय योजनेचा लाभ देण्यासंदर्भात पालक सचिव आणि संबंधित जिल्हाधिकारी यांच्यामार्फत अभियान राबविण्यासंदर्भात उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी यावेळी सुचना दिल्या. त्यांना ओळखपत्र दिल्यास पोलीस स्थानकामार्फत सुरक्षा आणि रूग्णालयात वैद्यकीय सुविधा प्राधान्याने देणे सुलभ होणार आहे. ग्रामीण भागातील महिलांच्या मालमत्तेचे जबरदस्तीने हस्तांतरण होऊ नये यासाठीही उपाययोजना आखणे आवश्यक आहे.

ग्रामीण आणि शहरी भागातील एकल महिलांच्या रोजगार संदर्भातील समस्या वेगळ्या असल्याने प्रदेशाप्रमाणे त्या जाणून त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. असेही त्यांनी यावेळी सांगितले.

दरम्यान, आयुक्त नैना गुंडे यांनी आदिशक्ती अभियानांतर्गत विविध विभागाच्या माध्यमातून महिलांसाठी विविध योजना राबविण्यात येणार आहेत. त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासंदर्भातील धोरणाची माहिती दिली.

# आपत्ती निवारणास अधिक निधी

**मुंबई दि. २९ प्रतिनिधी**

मुंबईत सद्या पावसाळी पाण्याचा निचरा करणारी ५५ मि.मी. तासाची क्षमता असलेली यंत्रणा आहे. मात्र, जास्त पाऊस पडला तर त्या क्षमतेची यंत्रणा उपलब्ध असणे आवश्यक आहे. या दृष्टीने एक स्वतंत्र आराखडा तयार करा. याबाबत केंद्रीय गृह खात्याच्या नॅशनल डिझास्टर मॅनेजमेंट ॲथॉरिटीकडून मुंबईला अधिकचा निधी दिला जाणार आहे, अशी माहिती मुंबई उपनगरचे पालकमंत्री आशिष शेलार यांनी दिली.

मुंबईत उद्भवणारी पूरस्थिती आणि पाण्याचा निचरा याबाबतच्या उपाययोजनांबाबत मुंबई उपनगर पालकमंत्री शेलार यांच्या दालनात बैठक झाली. या बैठकीला बृहन्मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विपीन शर्मा, अमित सैनी, अभिजीत बांगर यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. मुंबईत २०१७ मध्ये एकूण २६ दिवस, तर सन २०२४ मध्ये २१ दिवस पाऊस पडला होता. मुंबईत सरासरी दरवर्षी १६ ते २० दिवस पाऊस पडतो. हा पाऊस एका तासाला १०० मिमी. पेक्षा जास्त असतो, असेही महापालिकेच्या अभ्यासातून समोर आले आहे. सन २०१४ ते २०१९ या कालखंडात तासाला १३१ मिमी. तर १९ मे रोजी जो पाऊस झाला तो एका तासाला १८२ मिमी. एवढा होता. २६ जुलै २००५ ला जो जलप्रलय झाला, त्या वेळी मुंबईत सुमारे १ हजार मिमी. पाऊस १६ तासांत झाला होता, तर तासाला १३९ मिमी. पावसाची नोंद झाली होती. त्याचवेळी समुद्राला भरती असल्याने प्रचंड पुराचा



फटका मुंबईला बसला होता. आताही १०० मिमी. पेक्षा जास्त पाऊस एका तासाला होत असून, त्याचवेळी भरती असेल तर पाण्याचा निचरा होत नाही व पूरपरिस्थितीचा सामना मुंबईला करावा लागतो. आता ५५ मिमी. प्रत्येक तासाला पाऊस झाला तर पाणी वाहून नेणारी यंत्रणा उभारण्यात आली आहे. मात्र, आता तासाला १०० मिमी.पेक्षा जास्त पाऊस होत असल्याने ही क्षमता वाढवण्याची आवश्यकता आहे.

**एका महिन्यात आराखडा तयार करणार**

शहरातील पूरपरिस्थितीचा अभ्यास करून एक कृती आराखडा तयार करण्यासही सांगितले आहे. याकामी मुंबई महापालिकेने जो आराखडा तयार केला त्याचा अभ्यास आयआयटीची तज्ज्ञ समिती करत आहे. हा आराखडा तयार करताना मुंबईतील रेल्वे, मेट्रो, एमएमआरडीएसह सर्व प्राधिकरणांचा समन्वय व चर्चा करून हा अहवाल तयार करण्यात यावा, असे निर्देशही या वेळी मंत्री शेलार यांनी अधिकाऱ्यांना दिले. हा आराखडा येत्या एक महिन्यात तयार करावा, असे निर्देशही शेलार यांनी या वेळी दिले.

# ड्रग्ज तस्करीप्रकरणी इंडोनेशियन नागरिकाला अटक

**मुंबई दि. २९ प्रतिनिधी**

ओशिवरा पोलिसांनी एका मोठ्या कारवाईत आंतरराष्ट्रीय ड्रग्ज तस्करी रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी दोन इंडोनेशियन नागरिकांना अटक केली आणि त्यांच्याकडून एकूण २१ किलो ५५२ ग्रॅम हायड्रोफोनिक गांजा जप्त केला, ज्याची आंतरराष्ट्रीय बाजारात किंमत २१.५५ कोटी रुपये आहे.

ही कारवाई एपीआय विकास कदम आणि कॉन्स्टेबल सिराज मुजावर यांना गुप्त माहिती मिळाली की एक व्यक्ती ड्रग्ज तस्करी करण्याच्या उद्देशाने ओशिवरा पोलीस ठाण्याच्या परिसरात येणार आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या आदेशानंतर एपीआय कदम आणि डिटेक्शन टीमने जोगेश्वरी पश्चिम परिसरात छापा टाकला. छापेमारीदरम्यान बुडी वियोनो (४४) आणि रहमत अर्दी हिदायत (३९) या दोन परदेशी नागरिकांना ताब्यात घेण्यात आले. दोघेही इंडोनेशियाचे रहिवासी आहेत. शोधमोहीमे दरम्यान त्यांच्याकडून उच्च दर्जाचे हायड्रो गांजा जप्त करण्यात आला, जो आंतरराष्ट्रीय स्तरावर खूप जास्त किमतीत विकला जातो. पोलिसांनी दोघांविरुद्ध एनडीपीएस कायदा १९८५ च्या कलम ८ (अ), २० (ब) २ (अ) आणि २९ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे आणि त्यांना अटक केली आहे. या तस्करीमागील संपूर्ण नेटवर्क उघड करण्यासाठी सध्या या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

# वरळी टॉवरच्या खर्चात ३७ कोटींची कपात

**मुंबई दि. २९ प्रतिनिधी**

मुंबई महानगरपालिकेने वरळी येथील डांबरीकरण प्रकल्प आणि चाचणी प्रयोगशाळेच्या जागेवर उभारण्यात येणाऱ्या २९ मजली व्यावसायिक इमारतीच्या प्रस्तावित प्रकल्पाच्या खर्चात ३७कोटी रुपयांची मोठी कपात केली आहे. या प्रकल्पातील रोबोटिक पार्किंग प्रणालीच्या अवास्तव खर्चाबाबत केलेल्या तक्रारीनंतर ही कपात करण्यात आल्याची माहिती आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली यांनी दिली.

वरळी टॉवर प्रकल्पाचा खर्च ५२५ कोटी रुपये एवढा होता, त्यात ४५० वाहनांसाठी रोबोटिक पार्किंगसाठी ९६ कोटी रुपये खर्च केले जाणार होते. गलगली यांनी ऑगस्ट २०२४ मध्ये पालिका आयुक्त आणि मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून या खर्चावर आक्षेप नोंदवला होता. अन्य शहरांमध्ये याच प्रकारची प्रणाली कमी खर्चात बसवली जात असल्याचे निदर्शनास आणून दिले होते. या पाठपुराव्याची दखल घेत महानगरपालिकेने जुन्या निविदेला रद्द करून मे २०२५ मध्ये नवीन निविदा प्रसिद्ध केली, यात एकूण खर्च ४८८ कोटी रुपये ठरवण्यात आला.

तक्रारीनंतर जुनी निविदा रद्द करण्यात आली असून, पुनर्नियुक्त तांत्रिक सल्लागार आणि कार्यकारी अभियंता (वाहतूक नियंत्रण) यांच्या सल्ल्याने रोबोटिक पार्किंगची नवीन अंदाजित किंमत ७२ कोटी रुपये निश्चित करण्यात आली आहे. सध्या वरळीतील या भूखंडावर पालिकेचे डांबरीकरण यंत्रणा आणि मटेरीयल टेस्टिंग लॅब कार्यरत असणार आहे.

**नव्या इमारतीत या सुविधा असणार**

नव्या प्रस्तावित इमारतीत रोबोटिक पार्किंग प्रणाली, अद्ययावत प्रयोगशाळा आणि सतर्कता विभाग, रस्ते विभाग आणि थेट निगराणी करणारे कमांड सेंटर, पालिकेच्या उत्पन्नासाठी वाणिज्यिक कार्यालये (फर्निचरविना) असतील. ही पार्किंग यंत्रणा पुढील २० वर्ष वापरण्यासाठी तयार करण्यात येणार असून, ती या इमारतीतील अधिकारी, कर्मचारी व बाह्य कार्यालय वापरकर्त्यांसाठी असेल.

# 9 जुलै रोजी गिरणी कामगार धडकणार विधान भवनावर

**मुंबई दि. २९ प्रतिनिधी**

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत बहुमूल्य योगदान दिलेल्या गिरणी कामगारांना मुंबई किंवा मुंबईलगत घरे मिळणे हा हक्क आहे. मात्र, राज्य सरकार आणि म्हाडा, खाजगी विकासकाकडून माथेराननजीक घरे कामगारांनी घ्यावी, असा दबाव टाकत आहे. जर घरे नाकारली तर गिरणी कामगारांचा हक्क डावलण्यात येणार असल्याची धमकीवजा सूचनाच राज्य सरकारने अध्यादेशातून स्पष्ट केली आहे. ही दादागिरी गिरणी कामगार खपवून घेणार नसून, ९ जुलै रोजी विधान भवनावर राज्यभरातून कामगार धडकणार असल्याचे राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे अध्यक्ष सचिनभाऊ अहिर यांनी शनिवारी स्पष्ट केले. ते गिरणी कामगारांच्या गृहप्रश्नाबाबत आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

मागील १० वर्षांत गिरणी कामगारांसाठी नव्याने गृहनिर्मिती केलेली नाही. पंतप्रधान आवास योजनेंतर्गतची घरे गिरणी कामगारांना

देण्याचा दबाव वाढत आहे. १५ मार्च २०२४ रोजी राज्य सरकारने जारी केलेल्या अध्यादेशानुसार, म्हाडाकडून गिरणी कामगारांनी घरे नाकारल्यास घरांवरील हक्क सोडण्याचा फतवा काढला आहे. हा गिरणी कामगारांवर अन्याय आहे. शेलू-वांगणीची घरे विकासकाने १५ लाख किमतीत उपलब्ध केली आहेत. मात्र, इतर खाजगी विकासकांची घरे ११ लाख किंवा त्याहून कमी किमतीत उपलब्ध आहेत. ९.५ लाख रक्कम गिरणी कामगारांकडून आणि उर्वरित रक्कम योजनेंतर्गत लागू करण्यात येणार असल्याने आर्थिक फसवणूक नेमकी कुणाची चालली हा प्रश्न सचिनभाऊ अहिर यांनी उपस्थित केला आहे. धारावी पुनर्विकासात खाजगी विकासकांना गृहनिर्मितीसाठी मुंबईतील विविध भूखंड उपलब्ध करण्यात येतात. मात्र, गिरणी कामगारांच्या घरांसाठी जमीन शिल्लक नसल्याचे सांगण्यात येते, याबाबत कामगार संघटना संतप्त झाल्या आहेत.

# चेंबूरातील बंद आरएमसी प्लांट पुन्हा सुरु होणार

**मुंबई दि. २९ प्रतिनिधी**

चेंबूरच्या वाशीनाका येथील विष्णूनगर परिसरातील प्रयागनगर व प्रकाशनगरातल्या भरवस्तीत असलेले दोन आरएमसी प्लांट २०१७ मध्ये स्थानिक नागरिकांच्या मदतीने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने बंद पाडले होते. मात्र आता पुन्हा या प्लांटला प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून परवानगी मिळाल्याने स्थानिकांमधून संताप व्यक्त होत आहे.

प्लांटच्या कामाला देखील सुरुवात झाल्याने स्थानिक नागरिक आक्रमक झाले आहेत. शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाच्यावतीने तीव्र आंदोलनाचा इशारा प्रदूषण नियंत्रण मंडळ व पालिकेला देण्यात आला आहे.

प्रयागनगर व प्रकाशनगर मोठ्या प्रमाणात लोकवस्तीने व्यापला असून आजूबाजूला तेल कंपन्या आहेत. त्यामुळे प्रदूषण हे त्यांच्या पाचवीला पुजलेले आहे. श्वसनासह विविध आजारांनी येथील नागरिक त्रस्त आहेत. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत येथील लोक राहत आहेत.

२०१३ च्या दरम्यान या ठिकाणी दोन आरएमसी प्लांट उभारण्यात आले. भर लोकवस्तीत आरएमसी प्लांट उभारल्याने स्थानिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत होता. मात्र अनेक तक्रारी करूनही त्यावर दखल घेण्यात आली नाही. २०१७ च्या पालिका निवडणुकीत निधी शिंदे या नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतर तत्कालीन उपविभागप्रमुख व सध्याचे विभाग क्र. ९ चे विभागप्रमुख प्रमोद शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलने व न्यायालयात धाव घेऊन दोन्हीही प्लांट बंद करण्यात आले. मात्र पुन्हा या ठिकाणी दोन आरएमसी प्लांटला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने परवानगी दिली आहे.

# डबेवाल्यांच्या सेवाशुल्कात वाढ

**मुंबई दि. २९ प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे यंदाही आषाढी एकादशी दिवशी ७ जुलै २०२५ ला एकदिवस डब्याची सेवा बंद ठेवणार असून, जुलै २०२५ पासून सेवा शुल्कात वाढ करण्याचा निर्णय मुंबईच्या डबेवाल्यांनी घेतला आहे.

मुंबई टिफिन बॉक्स सप्लायर्स चॅरिटी ट्रस्ट (मुंबई डबेवाला) नूतन अध्यक्ष उल्हास मुके व मुंबई टिफिन बॉक्स सप्लायर्स असोसिएशन अध्यक्ष रामदास करवंदे यांनी शनिवारी हा निर्णय घेतला. याबाबतचे पत्रक उल्हास मुके यांनी प्रसिद्धीस दिले. संतांच्या परंपरेला व वारकरी संप्रदायाशी घट्ट नाते असलेल्या डबेवाले बंधूंनी दरवर्षीप्रमाणे यंदाही आषाढी एकादशीच्या दिवशी म्हणजेच ७ जुलै २०२५ रोजी एक दिवसासाठी सेवा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. यादिवशी सर्व डबेवाले विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूर यात्रा करणार असल्याने ही सेवा एक दिवसासाठी थांबवण्यात येत आहे. सेवा हीच आमची पूजा आहे. पण; या दिवशी आम्ही ती सेवा विठोबाच्या चरणी अर्पण करतो आहोत. आम्हाला ग्राहकांनी सहकार्य करावे, अशी विनंती या पत्रकात करण्यात आली आहे.

# कंत्राटी कामगारांच्या मागण्यांबाबत बैठक घेऊ - मंत्री आकाश फुंडकर

**मुंबई दि. २९ प्रतिनिधी**

कंत्राटी कामगारांच्या मागण्यांवर सरकार सकारात्मक आहे. या मागण्यांबाबत लवकरच वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक बोलावून त्यावर निर्णय घेऊ, असे आश्वासन कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी नुकतेच मुंबई येथे दिले. भारतीय मजदूर संघाच्या विविध मागण्यांसाठी मंत्रालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीत भारतीय मजदूर संघाचे अध्यक्ष अनिल दुमणे, महामंत्री किरण मिलगीर, अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघ महामंत्री सचिन मेंगाळे, महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ अध्यक्ष निलेश खरात, शर्मिला पाटील, महाराष्ट्र कामगार आयुक्त तुमोड, उपसचिव कापडणीस, मुंबई ग्रामीण कामगार उपायुक्त संदेश कानडे आदींसह घरेलू कामगार संघ, कामगार पदाधिकारी, प्रतिनिधी उपस्थित होते. कामगारांना कंत्राटदारांपासून मुक्त करून थेट रोजगार मिळावा यासाठी हरियाणा पॅटर्नद्वारे सर्व कंत्राटी कामगारांना कंत्राटदारविरहित रोजगार द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. कंत्राटी कामगार पद्धतीमुळे कामगारांचे आर्थिक व सामाजिक शोषण गंभीर स्वरूप धारण करत आहे. कंत्राटी कामगारांना नियमित वेतन, पीएफ, ईएसआय, सुरक्षित कामकाजाच्या अटी यासारख्या मूलभूत हक्कांपासून वंचित ठेवले जात आहे. याचबरोवर अनेक कंत्राटदार कामगारांच्या पगारातून मोठ्या प्रमाणात कपात करत आहेत. त्याचा

थेट परिणाम कुटुंबियांच्या जीवनमानावर होत आहे. तसेच न्यायालयीन निर्णय व शासन परिपत्रक असूनही योग्य अंमलबजावणी होत नाही, ही अत्यंत गंभीर बाब आहे, असे मुद्दे बैठकीत मांडण्यात आल्याचे मेंगाणे यांनी सांगितले. मंत्री फुंडकर यांनी कामगारांच्या समस्या ऐकून घेतल्या. त्यानंतर या सर्व मागण्यांवर सरकार सकारात्मक आहे. यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांची लवकरच बैठक घेऊन निर्णय घेऊ, असे आश्वासन मंत्री फुंडकर यांनी दिले.

**भारतीय मजदूर संघाच्या मागण्या**

यानंतर कंत्राट पद्धती बंद करून कामागारांना थेट संस्थेत समाविष्ट करावे, शासकीय व निमशासकीय प्रकल्पांत कंत्राटीऐवजी नियमित भरती प्रक्रियेचा अवलंब करावा, विद्यमान कंत्राटी कामगारांना अनुभवाच्या आधारे कायमस्वरूपी नियुक्ती द्यावी, कामगार कायद्यांचे उल्लंघन करणाऱ्या कंत्राटदारांवर कठोर कारवाई करावी, प्रलंबित किमान वेतन फरकासह तातडीने अदा करावे, घरेलू कामगारांना 'सन्मान धन योजना' अंतर्गत विनाअट लाभ द्यावेत, सुरक्षा रक्षक व विद्युत कामगारांसाठी विशेष वेतनश्रेणी तयार करावी, आदी मागण्या भारतीय मजदूर संघाने केल्या.

# 'एमएमएस', 'एमसीए' प्रवेशअर्ज सुरू

**मुंबई दि. २९ प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत (सीडीओई) चालविण्यात येत असलेल्या एमएमएस (मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज्) आणि एमसीए (मास्टर ऑफ कम्प्युटर एप्लीकेशन) या दोन वर्षीय अभ्यासक्रमांच्या ऑनलाईन प्रवेश परीक्षेसाठी आजपासून अर्जाला सुरुवात होत आहे. २८ जून ते १७ जुलैपर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करता येणार असून २० जुलै रोजी ऑनलाईन पद्धतीने ही परीक्षा होणार आहे.

एमएमएस (मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज्) आणि एमसीए (मास्टर ऑफ कम्प्युटर एप्लीकेशन) हे दोन्ही अभ्यासक्रम युजीसी आणि एआयसीटी मान्यताप्राप्त आहेत. दोन्ही अभ्यासक्रमांच्या पात्रता, शुल्क, प्रवेश परीक्षेसंबंधातील अधिक तपशील मुंबई विद्यापीठाच्या सीडीओईच्या https://mu.ac.in/distance-open-leaming या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. प्रवेश परीक्षेसाठीचा अर्ज https://forms.epravesh.com/MumbaiUniversity/ या संकेतस्थळावरून सादर करता येईल.

एमएमएस (मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज्) या अभ्यासक्रमासाठी ७२० एवढी प्रवेश क्षमता असून एमसीए (मास्टर ऑफ कम्प्युटर एप्लीकेशन) या अभ्यासक्रमासाठी २००० एवढी प्रवेश क्षमता आहे. २०२१-२२ या शैक्षणिक वर्षांपासून एआयसीटीई व यूजीसीने सीडीओईच्या माध्यमातून मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (एमएमएस) या अभ्यासक्रमासाठी परवानगी दिली असून हा अभ्यासक्रम एमबीए या अभ्यासक्रमाच्या समकक्ष आहे.

एचआर, फायनान्स व मार्केटिंग या तीन विषयात एमएमएस हा अभ्यासक्रम करता येतो. एमसीए (मास्टर ऑफ कम्प्युटर एप्लिकेशन) हा दोन वर्षाचा सुधारित अभ्यासक्रम आहे. विद्यार्थ्यांनी विहित कालावधीत ऑनलाइन अर्ज सादर करण्याचे आवाहन दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. शिवाजी सरगर यांनी केले आहे.

## महत्त्वाच्या बातम्या

### मातंग समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी निःशुल्क जेईई, नीट प्रशिक्षणाकरिता नोंदणी करण्याचे आवाहन

**मुंबई, दि. २९ प्रतिनिधी**

अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (आर्टी) वतीने राज्यातील अनुसूचित जातीतील मातंग व इतर तत्सम समाजातील पात्र उमेदवारांसाठी जेईई आणि नीट प्रवेश परीक्षांचे निः शुल्क अनिवासी ऑफलाईन प्रशिक्षण खाजगी व नामांकित संस्थांमार्फत दिले जाणार आहे. मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, लातूर, अमरावती व नागपूर या ठिकाणी प्रशिक्षण केंद्र असतील. त्याकरीता मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील जे उमेदवार सन- २०२५ ची इयत्ता १० वी परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत, अशा उमेदवारांचे सन २०२५ ते मे २०२७ या कालावधीसाठी जेईई आणि नीट या प्रवेश परीक्षांचे अर्ज मागविण्यात येत आहेत. या प्रशिक्षणासाठी १० वीच्या गुणांच्या आधारे व ८ लाखापर्यंत उत्पन्न असलेल्या पात्र उमेदवारांची गुणानुक्रमे निवड केली जाईल. त्याकरीता इच्छुक व पात्र उमेदवारांनी १ जुलै पासून ३० जुलै पर्यंत https://cpetp.barti.in या लिंकवर जाऊन ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन आर्टीचे व्यवस्थापकीय संचालक सुनील वारे यांनी केले आहे.

### एका चुकीने गमावला लॉंड्रीचालकाने जीव

**मुंबई, दि. २९ प्रतिनिधी**

खोकल्याचे औषध समजून कपड्यांवरील डाग घालवण्यासाठीचे लिक्विड प्यायल्यामुळे लॉड्रीचालक सबाजित धोबी याचा मृत्यू झाला असून, एन. एम. जोशी मार्ग पोलीस याचा तपास करीत आहेत. येथील दीपक सिनेमासमोरील चाळीत सबाजित यांचा लाँड्रीचा व्यवसाय होता. काही दिवसांपूर्वी खोकला झाला होता, त्यासाठी त्यांनी पालिकेच्या रुग्णालयातून खोकल्याचे औषध आणले होते. मात्र, या औषधासारख्या एका बाटलीतच त्यांनी कपड्यांवरील डाग हटविण्यासाठी आणलेले लिक्विडही ठेवले होते. कामाच्या ओघात जास्त त्रास झाल्याने त्यांनी खोकल्याचे औषध समजून दुसऱ्या बाटलीतील लिक्विड प्यायले. त्यातूनच त्यराचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

### घरफोडी करणारा जेरबंद

**मुंबई, दि. २९ प्रतिनिधी**

मुंबई आणि आजूबाजूच्या परिसरात रात्रीच्या वेळी घरफोडी करणाऱ्या एका सराईत आरोपीला मीरा रोड पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण विभागाच्या पोलिसांनी अखेर जेरबंद केले. राहुल चौहान असे त्याचे नाव असून, त्याच्याकडून घरफोडीतील तब्बल ५ लाख ५२ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यातील तक्रारदार डायना विल्सन यांचे कुटुंब नेहमीनुसार या रात्रीच्या वेळी जेवण झाल्यानंतर घराचे दरवाजे व खिडकी बंद करून बेडरूममध्ये झोपी गेले. त्या वेळी पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास शेजारचे मांजर रुममध्ये आले. त्यामुळे तक्रारदारांना जाग आली. त्या वेळी संशय आल्याने त्यांनी घरातील दरवाजे व खिडकीची पाहणी केली असता, तक्रारदार यांना दुसऱ्या बेडरुमचा गॅलरीचा दरवाजा उघडा दिसला. दरवाज्याची कडी बाजूच्या खिडकीतून हात घालून उघडून रुममध्ये कोणीतरी आले असे वाटले म्हणून तक्रारदार यांनी कपाटातील ठेवलेले सोन्याचे दागिने पाहण्यासाठी कपाट उघडले. त्यातून त्यांना कपडे अस्ताव्यस्त दिसले. तर सोन्याची दागिने असलेली पिशवी (किंमत ६ लाख ७३ हजार रुपये) ७७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व १ हजार रोकड अज्ञात व्यक्तीने चोरी केल्याचे आढळले.

### मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून नियमबाह्य शुल्क आकारणाऱ्या शाळांवर फौजदारी

**मुंबई, दि. २९ प्रतिनिधी**

अनुसूचित जाती, जमाती आणि मागासवर्गीय प्रवर्गातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून नियमबाह्य शुल्क आकारणाऱ्या शाळा, महाविद्यालयावर आता फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे परिपत्रक समाजकल्याण आयुक्त व प्रादेशिक आयुक्तालयांनी काढले आहे, अशी माहिती रिपब्लिकन स्टुडंटस युनियन संघटना प्रमुख ॲड. अमोल वेटम यांनी दिली. अनुसूचित जाती, जमाती आणि मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्याकडून शासकीय नियमांचे व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारची फी (शुल्क) वसूल करणाऱ्या शाळा, महाविद्यालयांवर फौजदारी गुन्हा दाखल करून मान्यता देखील रद्द करण्यात येणार आहे, समाजकल्याण आयुक्तालय, प्रादेशिक आयुक्तालयाने २६ जून रोजी याबाबत परिपत्रक काढले आहे, ॲड. वेटम यांनी सांगितले. संबधित मागासवर्गीय विद्यार्थ्याकडून नियमबाह्य शुल्क आकारणी झाली असल्यास त्यांनी समाजकल्याण विभागात संबंधित शाळा, महाविद्यालय विरोधात तक्रार नोंदवावी. अनेक शाळा, महाविद्यालयात अनुसूचित जाती, ज माती, मागासवर्गीय विद्यार्थ्याकडून तसेच मुलींना संपूर्ण शुल्क माफ असताना देखील सर्व नियम धाब्यावर बसवून संपूर्ण शुल्क भरण्याची सक्ती किंबहुना संपूर्ण शुल्क घेण्यात आली आहे. याबाबत विद्यार्थ्यांनी न घाबरता शासनाकडे तक्रार करावी, असे आवाहन रिपब्लिकन स्टुडंटस युनियन संघटनेने केले आहे.

### पश्चिम नौदल कमांड मुख्यालयाच्या धोरणाविरोधात कामगारांचे आंदोलन

**मुंबई, दि. २९ प्रतिनिधी**

पश्चिम नौसेना मुख्यालय व त्यांच्या संलग्न युनिटसकडून होत असलेल्या अन्यायकारक कामगार धोरणांचा निषेध करण्यासाठी व विविध मागण्यांसाठी शनिवारी आझाद मैदानात इंडियन नेव्हल एम्प्लॉईज युनियनने लाक्षणिक आंदोलन केले. युनियन अध्यक्ष प्रदिप गांधी यांनी आंदोलनाचे नेतृत्व केले. आंदोलनात अमित आमले, संतोष कुमार प्रसाद, चंद्रशेखर माळवदे सुनिल कोंडगेकर यांच्यासह कामगार प्रतिनिधींचा सहभाग होता. यावेळी प्रदिप गांधी म्हणाले, पश्चिम नौसेनेत काम करणाऱ्या कामगारांना मुख्यालयातील वरिष्ठ अधिकारी जाणूनबुजून त्रास देत आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून शिवीगाळही केली जात आहे. तसेच बदल्या निवडक पद्धतीने होत आहेत. त्या कोणतीही स्पष्ट कारणे न देता केल्या जात आहेत. त्याचा कामकाजावर परिणाम होत असून यामुळे कामगार त्रस्त झाले आहेत. याबाबत दिल्ली येथील कार्यालयाला पत्रव्यवहार केला. मात्र त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे.

### राज्यात ३ जुलैपर्यंत हलक्या पावसाची शक्यता

**मुंबई, दि. २९ प्रतिनिधी**

कोकण आणि मध्य महाराष्ट्र वगळता राज्यातील इतर भागातील मोठा पाऊस पूर्ण कमी झाला आहे. रविवारी आणि सोमवारी या दोन्ही भागात रिंज, तर ३ जुलैपर्यंत यलो अलर्ट देण्यात आला आहे. मराठवाड्यात मात्र २ जुलैनंतर पाऊस सुरू होणार आहे. राज्यातील हवेचे दाब वाढल्याने सध्या फक्त कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील पुणे, कोल्हापूर, सातारा घाटमाथ्यावर चांगला पाऊस सुरू आहे. मात्र मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील पाऊस कमी झाला आहे.

